# आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेवेळी वापरलेल्या कौशल्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास

श्री. देवेंद्र बापुसोा बिरनाळे, नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, इचलकरंजी.

..........................................................................................................

**१. प्रास्ताविक :** भारतामध्ये विविध प्रकारचे खेळ खेळले जातात. पण इतर खेळांपेक्षा कबड्डी हाच खेळ अधिक लोकप्रिय आहे. या खेळाच्या सोप्या नियमामुळे व खेळातील रोमांच्यामुळे आंतर– राष्ट्रीय पातळीवरही लोकप्रिय होऊ लागला आहे. आज कबड्डी खेळाकडे इतर परदेशी खेळाप्रमाणे व्यावसायीक दृष्टीकोनातून पाहिले जात आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील आज आशियाई स्पर्धा सॅफ गेम स्पर्धा, वर्ल्ड कपच्या स्पर्धा तसेच दोन देशांतील कसोटी सामने खेळले जात आहेत. तसेच पुरूषांच्या बरोबरच महिलांच्याही आशियाई अजिंक्यपद स्पर्धा होत आहेत. इतर आंतरराष्ट्रीय खेळाप्रमाणेच ज्युनिअर गटाच्याही मुला–मुलींची आंतरराष्ट्रीय स्पर्धा होत आहेत. अशा या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळाडूंकडून निरनिराळ्या कौशल्य व तंत्राचा वापर होत आहे. मात्र या आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील कौशल्याचे वर्गीकरण व्यवस्थीतपणे आजपर्यंत झालेले नसून या खेळाला शास्त्रोक्त दिशा देणे गरजेचे व महत्त्वाचे आहे.

या खेळात जे खेळाडू आपल्या कौशल्याने आणि तंत्राने संघास गुण प्राप्त करून देतात ती कौशल्य कोणती आहेत हे पाहणे व शोधणे महत्त्वाचे आहे. कबड्डी खेळामध्ये कौशल्ये बरीच आहेत पण प्रत्यक्षात आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये कोणत्या कौशल्याचा वापर, सहभागी संघ व खेळाडू करतात ते शोधणे हा संशोधनाचा उद्देश आहे.

**२. संशोधनाची उद्दिष्ट्ये**

१. आंतरराष्ट्रीय कबड्डीस्पर्धेच्या वेळी खेळाडू द्वारे सामन्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या कौशल्याचे निरिक्षण करण्यासाठी निरिक्षण तक्ता तयार करणे.

२. आंतरराष्ट्रीय कबड्डीस्पर्धेच्यावेळी चढाई करणारे व क्षेत्ररक्षण करणारे खेळाडू वापरत असलेल्या कौशल्याचे परिस्थिती निहाय विश्लेषण करणे. ( क्षेत्ररक्षण करणारे खेळाडू ६ किंवा ७ असताना व ५ किंवा ५ पेक्षा कमी असताना)

**३ गृहितके**

१. खेळाडू स्पर्धेदरम्यान सामन्यामध्ये योग्य कार्यमानाचे प्रदर्शन करतील.

२. संशोधनासाठी वापरण्यात येणारी साधने प्रमाणित असतील.

३. संकलित केलेली माहिती वैध असेल.

४. कबड्डी खेळातील विविध कौशल्य सर्व खेळाडूंना माहिती आहेत.

५. 'इंटरनॅशनल कबड्डी फेडरेशन' ने केलेल्या खेळाच्या सर्व नियमांची माहिती खेळाडूंना असेल.

**४ परिसिमा**

१. प्रस्तुत संशोधन हे आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेपुरतेच मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे आंतरराष्ट्रीय पुरूष कबड्डीखेळाडूपुरतेच मर्यादित आहे.

३ प्रस्तुत संशोधन हे २०१० – २०१४ सालामध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धा पुरतेच मर्यादित आहे.

४. प्रस्तुत संशोधन हे चढाई व क्षेत्ररक्षण करणारे खेळाडू कोणत्या कौशल्याचा वापर करून हमखास गुण मिळवतात. त्याच कौशल्याचा विचार संशोधनासाठी करण्यात येईल.

**५) संशोधनाच्या मर्यादा**

१. दुखापती मुळे खेळाडूच्या कौशल्यावर होणाऱ्या परिणामांवर संशोधकाचे नियंत्रण नव्हते.

२. बाह्य वातावरण प्रेरणा, मार्गदर्शन या घटकांचा व कौशल्याचा संबंध यावर संशोधनाचे नियंत्रण नाही.

३. संशोधनात माहिती संकलनासाठी संशोधकाने निरिक्षक, प्रशिक्षित तज्ञ यांची मदत घेतली आहे ही संशोधनाची मर्यादा आहे.

४. आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धे दरम्यान सामन्याचे होणारे व्हिडीओ रेकॉर्डिंग चित्रफितीवर प्रस्तुत संशोधन अवलंबून आहे.

५. सदर संशोधन हे निवडक सामन्यांच्या व्हिडिओ चित्रिकरणावरच पूर्णपणे अवलंबून आहे.

**६) संशोधन पद्धती**

संशोधकाने संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधनातील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे.

**७) जनसंख्या :**आंतरराष्ट्रीय स्तरावरील कबड्डी खेळाच्या विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या देशांचे संघ व संघातील खेळाडू ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या होय.

**८) न्यादर्श निवड पद्धती** : सदर संशोधनासाठी असंभाव्यता पद्धतीमधील सहेतूक न्यादर्श पद्धतीचा वापर केला आहे. कारण २०१० ते २०१४ या साला दरम्यान झालेल्या आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेमधील

एकूण ५७ सामन्यांपैकी ३० सामने व प्रत्येक देशाच्या संघाकडून खेळणारे १२ खेळाडू यांचा समावेश न्यादर्शनात करणेत आला आहे..

| स्पर्धेचे नाव | स्पर्धेतील सामन्यांचीएकूण संख्या | न्यादर्श साठी निवडलेल्या सामन्यांची एकूण संख्या |
|---|---|---|
| आशियाई स्पर्धा २०१० | १६ | १० |
| ११ वी सॅफ गेम्स स्पर्धा | १२ | ०३ |
| आशियाई स्पर्धा २०१४ | १६ | ११ |
| जपान दौरा २०११ | ५ | ०२ |
| तेवान दौरा २०१२ | ८ | ४ |
| एकूण | ५७ | ३० |

**९) संशोधनाची साधने**

माहिती संकलित करण्यासाठी प्रस्तुत संशोधनात आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या चित्रफिती मिळवून त्या चित्रफितीवरून तज्ञांच्या मार्गदर्शनानुसार संशोधकाने स्वत: हा निरिक्षण तक्ता तयार केला आहे. निरिक्षण तक्ता तयार करताना शास्त्रीय पद्धत वापरण्यात आली आहे.प्रस्तुत संशोधनासाठी आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या चित्रफिती तज्ञांना दाखवून त्यानुसार निरिक्षण तक्ता तज्ञांकडून भरून घेतला आहे. निरिक्षण तक्त्याद्वारे अध्ययन केले आहे.

**१०) संख्याशास्त्रीय साधने –** शेकडा प्रमाण या संख्याशास्त्रीय परिमानाचा वापर केला आहे.

**११) विश्लेषण**

**आंतरराष्ट्रीय कबड्डी सामन्यांमध्ये चढाई करताना खेळाडूंनी वापरलेल्या यशस्वीकौशल्याचे विश्लेषण (सामने संख्या –३०)**

| कौशल्याचे नाव | संख्या | शेकडा प्रमाण (%) | परिस्थिती अ | शेकडा प्रमाण (%) | परिस्थिती ब | शेकडा प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| बोनस गुण घेणे | २३३ | २३.४४ | २३३ | २३.४४ | – | – |
| हाताने गडी स्पर्श करणे | २२६ | २२.७४ | १२६ | १२.६८ | १०० | १०.०६ |
| पायाने गडी स्पर्श करणे | ७७ | ७.७५ | ६४ | ६.४४ | १३ | १.३१ |
| लत्ता प्रहार | ६२ | ६.२४ | २७ | २.७४ | ३५ | ३.५२ |
| साखळी खालून जाणे | १० | १.०१ | ९ | ०.९१ | १ | ०.१० |
| साखळी वरून जाणे | १० | १.०१ | ३ | ०.३० | ७ | ०.७० |
| झटापटीतून निसटणे | ३७६ | ३७.८२ | २२५ | २२.६४ | १५१ | १५.१९ |
| पाठलाग | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | ९९४ | १०० | ६८७ | ६९.१२ | ३०७ | ३०.८८ |

**आंतरराष्ट्रीय कबड्डी सामन्यांमध्ये क्षेत्ररक्षण करताना खेळाडूंनी वापरलेल्या यशस्वी कौशल्याचे विश्लेषण (सामने संख्या –३०)**

| कौशल्याचे नाव | संख्या | शेकडा प्रमाण (%) | परिस्थिती अ | शेकडा प्रमाण (%) | परिस्थिती ब | शेकडा प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| चवडा पकड | ५६ | १०.७९ | ४९ | ९.४४ | ७ | १.३५ |
| सूर मारून पकड | ५४ | १०.४० | २४ | ४.६२ | ३० | ५.७८ |
| साखळी लावणे | ६५ | १२.५२ | ५६ | १०.७९ | ९ | १.७३ |
| कंबर पकड | ४७ | ९.०६ | ३० | ५.७८ | १७ | ३.२८ |
| खेळाडू थोपवणे (ब्लॉक) | १६९ | ३२.५६ | १२५ | २४.०८ | ४४ | ८.४८ |
| पट्ट काढणे | १२८ | ४४.६६ | ६३ | १२.१४ | ६५ | १२.५२ |
| एकूण | ५१९ | १०० | ३४७ | ६६.८६ | १७२ | ३३.१४ |

*परिस्थिती अ – ६ किंवा ७ खेळाडू क्षेत्ररक्षण करताना,

*परिस्थिती ब – ५ किंवा ५ पेक्षा कमी खेळाडू क्षेत्ररक्षण करताना.

**१२)निष्कर्ष : चढाई करताना वापरलेल्या कौशल्यांचे निष्कर्ष**

➢ ३० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये चढाई करणाऱ्या खेळाडूंनी ९९४ वेळा यशस्वी कौशल्यांचा वापर केला आहे व क्षेत्ररक्षण करणाऱ्या खेळाडूंनी ५१९ वेळा यशस्वी कौशल्यांचा वापर केला आहे.

➢ चढाई करणाऱ्या खेळाडूंनी झटापटीतून यशस्वी निसटणे या कौशल्याचा वापर सर्वात जास्तवेळा केलेला आहे. तर साखळी वरून जाणे व साखळी खालून जाणे या कौशल्याचा वापर सर्वात कमी वेळा केलेला आहे. तर पाठलाग या कौशल्यांचा वापर वापर एकदाही केलेला नाही.

➢ चढाई करताना क्षेत्ररक्षण करणारे खेळाडू ६ किंवा ७ असताना बोनस गुण घेणे या कौशल्याचा वापर जास्तवेळा केला आहे. तर साखळी खालून जाणे या कौशल्याचा वापर सर्वात कमी वेळा केलेला आहे. तर पाठलाग या कौशल्यांचा वापर एकदाही केलेला नाही.

➢चढाई करताना क्षेत्ररक्षण करणारे खेळाडू ५ किंवा ५ पेक्षा कमी असताना यशस्वी झटापटीतून निसटणे या कौशल्याचा वापर सर्वात जास्त वेळा केलेला आहे. तर साखळी वरून जाणे व साखळी खालून जाणे या कौशल्यांचा वापर सर्वात कमी वेळा केलेला आहे. तर पाठलाग या कौशल्यांचा वापर एकदाही केलेला नाही.

**क्षेत्ररक्षण करताना वापरलेल्या कौशल्यांचे निष्कर्ष**

➢क्षेत्ररक्षण करताना क्षेत्ररक्षण करणारे खेळाडू चढाईकरणाऱ्या खेळाडूस थोपवणे (ब्लॉक) या कौशल्याचा वापर सर्वात जास्त वेळेला करतात. सुर मारून खेळाडूस पकडणे या कौशल्याचा वापर सर्वात कमी वेळा करतात.

➢क्षेत्ररक्षण करताना क्षेत्ररक्षण करणारे खेळाडू ६ किंवा ७ असताना खेळाडू थोपवणे (ब्लॉक) या कौशल्याचा वापर जास्त वेळेला तर सुर मारून खेळाडूस पकडणे या कौशल्याचा वापर सर्वात कमी वेळेला करतात.

➢क्षेत्ररक्षण करताना क्षेत्ररक्षण करणारे खेळाडू ५ किंवा त्यापेक्षा कमी असताना क्षेत्ररक्षक पट पकडणे या कौशल्याचा वापर सर्वात जास्त वेळेला करतात तर चवडा पकड व साखळी लावणे या कौशल्याचा वापर सर्वात कमी वेळेला करतात.

**संदर्भ सूची**

**पुस्तके**

१.आगलावे, प्रदिप (२०००). *संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे*, विद्या प्रकाशन, नागपूर.

२.भेंडीगीरी, आर. एन. (१९९६), *आधुनिक व शास्त्रीय कबड्डी प्रशिक्षण,* प्रथम आवृत्ती, ताराराणी स्पोर्टसक्लब प्रकाशन, कोल्हापूर.

3.E Prasad Rao (2002). The Complete Handbook On Kabaddi. First Published, Jagdamba Publication, Vizianagram.

**प्रबंध**

१. भेंडीगिरी, र. ना. (२००६). *कबड्डी खेळातील स्पर्धे वेळी वारंवार उपयोगात येणाऱ्या* कौशल्याचा *विश्लेषनात्मक अभ्यास करणे व त्यानुसार मार्गदर्शनाची दिशा ठरविणे. हा वर्णनात्मक अध्ययन.* अप्रकाशीत पीएच. डी. (शारीरिक शिक्षण) लघुप्रबंध. पुणे विद्यापीठ, पुणे.

**इंटरनेट वरील संदर्भसूची**

1.International Kabaddi Faderation (2010). *Member Countries, Homepage,* Retrieved, July 30, 2010. from http://www.kabaddiikf.com/countries.htm.

2. International Kabaddi Faderation (2010). *World cup 2007, Homepage,* Retrieved, July 30, 2010.from http://www.kabaddiikf.com/scheduel2004.htm.